# झांबरे विद्यालयात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सेफ्टी अवेअरनेस'

**जळगाव** | ए. टी. झांबरे माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र सायबर (मुंबई), क्विक हिल फाउंडेशन, केबीसीएनएमयू यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सेफ्टी अवेअरनेस' हा कार्यक्रम घेण्यात आला. सोशल मीडियाशी निगडित जे गुन्हे होतात त्यापासून दूर कसे राहावे, व्हायरसचे दुष्परिणाम, मोबाइलच्या अतिवापराचे तोटे, इंटरनेट, अँटीव्हायरस याबाबत ऐश्वर्या परदेशी, वैशाली चौधरी यांनी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक डी. व्ही. चौधरी, के. जी. फेगडे, महेंद्र नेमाडे, डी. ए. पाटील, पूनम कोल्हे, सुचेता शिरसाठ, प्रतिभा लोहार, रोहिणी पाटील उपस्थित होते.